फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन)प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त केलेल्या खटला क्रं.९१/२०२२ चा अभिलेख

**निशाणी क्रं. – /सी**

**श्री.एन.के.नागरगोजे, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कळे–खेरीवडे यांचे न्यायालयात.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | १४–०६–२०२२. |
| २. | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | – | १४–०६–२०२२. |
| ३. | फिर्याददारराचे नांव, त्यांच्या आई व बापाचे नांव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | – | सहा.पोलीस निरीक्षक, कळे पोलीस ठाणे, ता. कळे, जि.कोल्हापूर. |
| ४. | आरोपीचे नांव, त्यांच्या आई व बापाचे नांव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | | सुरेश हिंदुराव केसरकर, व.व.४२, गवशी, ता. राधानगरी,जि.कोल्हापूर. |
| ५–अ | ज्याच्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील – | | |

तुम्ही वर नमूद आरोपी सुरेश हिंदुराव केसरकर यांनी दिनांक १४–०६–२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजताचे बळपवाडी गावचे हद्दीतील कळे ते म्हासुर्ली जाणारे रोडवर, बामण ओढयाजवच्या पुढे वळणावर रोडवर तुमच्या ताब्यातील एस.टी.बस क्रं. एम.एच्–४० एन–८०१० ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती

पोहचेल इतक्या बेदरकारपणे, हयगयीने चालवून सी.डी.डिलक्स मोटरसायकल क्रं. एम.एच.–०९सी.टी–९९३० ला समोरुन धडक देवून मोटरसायकल चालक सखाराम सदाशिव जाधव व पाठीमागे बसलेले सिमा सखाराम जाधाव व स्वरांजली सखाराम जाधव यांचा अपघात करुन जखमी केले त्याप्रमाणे तुम्ही माझ्या अखत्यारीत भारतीय दंड विधान **कलम २७९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

दुसरे असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमूद एस.टी.बस क्रं. एम.एच्–४० एन–८०१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून सी.डी.डिलक्स मोटरसायकल क्रं. एम.एच.–०९सी.टी–९९३० यास समोरुन जोराची धडक देवून मोटरसायकलवर पाठीमागे बसलेल्या सिमा सखाराम जाधव व स्वरांजली सखाराम जाधव यांना दुखापत पोहचवीलीत म्हणून तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय दंड विधान **कलम ३३७** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

तिसरे असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमूद एस.टी.बस क्रं. एम.एच्–४० एन–८०१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून सी.डी.डिलक्स मोटरसायकल क्रं. एम.एच.–०९सी.टी–९९३० यास समोरुन जोराची धडक देवून मोटरसायकलस्वार सखाराम सदाशिव जाधव यास गंभीर

दुखापत पोहचवीलीत म्हणून तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय दंड विधान **कलम ३३८** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

चौथे असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील  एस.टी.बस क्रं. एम.एच्–४० एन–८०१० ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे  परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन व अपघात करुन सी.डी.डिलक्स मोटरसायकल क्रं. एम.एच.–०९सी.टी–९९३० या दोन्ही वाहनांचे रुपये ५०/– किंवा त्याहून अधिक रकमेपर्यंत हानी अथवा नुकसान घडवूल आणले  म्हणून तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय दंड विधान कायदा **कल ४२७** अन्वेय शिक्षापात्र गुन्हा केला आहे.  सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

शेवटी असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमूद एस.टी.बस क्रं. एम.एच्–४० एन–८०१० ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन व अपघात केला व  त्याप्रमाणे तुम्ही माझे अखत्यारीत मोटार वाहन कायदा **कलम १८४** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे.  सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

यावरुन मी असा आदेश देतो की, उपरोक्त कलमाअंतर्गत तुमच्याविरुध्द खटला चालविण्यात  यावा.

**ब.)** **<u>कलम व अधिनियम</u>** – भा.द.वि.स.क २७९, ३३७, ३३८ आणि ४२७ व मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे.

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u>** –

प्रश्न १– तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर–

प्रश्न २– तुम्हाला आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचून समजावून सांगण्यात आला तो तुम्हाला समजला ?

उत्तर–

प्रश्न ३– तुम्हाला गुन्हा कबूल आहे का?

उत्तर–

समक्ष ...............................

(आरोपीची सही/अंगठा)

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कळे–खेरीवडे.

आरोपीने माझे समक्ष आरोपांचा तपशील त्याच्या भाषेत सुनावण्यात आला. तो त्यास कबूल नसून आरोपी केस पुढे चालविण्यास तयार आहे.

दि.१९.०८.२०२३.
कळे–खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कळे–खेरीवडे.